जा.क्र.अनु-२/शिक्षकपदे/२००७-०८/8179-82
उच्चशिक्षण,जळगांव विभाग,जळगांव
दिनांक- 16-10-2008

प्रति

प्राचार्य
कै. न्हानाभाऊ मन्साराम तुकाराम पाटील कला म.वि. मारवड ता.अमळनेर
जि.जळगांव

विषय - नवीन शिक्षकांची पदे मान्य करणेबाबत - सन २००७-०८
संदर्भ - १.आपले पत्र क्रमांक- 203 /२००७-०८, दिनांक- 16/10/२००७

वरील विषयाच्या संदर्भात आपण पाठविलेला आपल्या महाविदयालयाचा विषय निहाय, विदयाशाखा निहाय कार्यभार तपासण्यात आला. शासन निर्णय क्रमांक-एनजीसी/१२९८/(४६१९)/युनि-४, दिनांक-११.१२.१९९९ च्या विहित केलेल्या कार्यभाराच्या मानकानुसार आपण पाठविलेल्या कार्यभाराची छाननी केली असून खालील अटींच्या अधिन राहून आपल्या महाविदयालयातील शिक्षक पदे मान्य करण्यात येत आहे. सदरचा कार्यभार तपासतांना शा.नि.दि.-१.६.८१ मधील तरतूदीनुसार सुट देण्यात आली आहे. अटी-शा.नि.क्र.संकीर्ण-१००२/(६९८/२००२)/आस्था-१,दि.११सप्टे.०३ व संचालनालयाचे पत्र क्र.एनजीसी/२००६/अपंगअन/मवि-१.दि.३०.९.०६ अन्वये अपंगअनुशेष भरणे आवश्यक राहील.

१. आपल्या महाविदयालयातील आपण दाखविलेली वर्षनिहाय विदयार्थी संख्या ही पटावर असणे आवश्यक आहे.
२. व्याख्याने/प्रात्यक्षिके/टयुटोरिअल/प्रोजेक्ट यासाठी दाखविलेल्या तासिका विदयापीठाने विहित केलेल्या व वेळोवेळी त्यात बदल केलेल्या नियमानुसार असणे आवश्यक आहे.
३. विषय निहाय दाखविलेल्या विविध तासिका प्रत्यक्ष वेळापत्रकात असणे आवश्यक आहे.
४. ही मान्यता पदांना वेतन अनुदान निर्धारण संदर्भात आहे. त्या पदावरील नेमणूका अस्तित्वात असलेल्या विदयापीठाच्या व शासनाच्या सर्व संबंधित नियमानुसार असाव्यात.
५. विषयाची/विदयाशाखांची/तुकडयांची किमान विदयार्थी संख्या शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या नियमानुसार असावी.
६. संबंधित विषयाची/तुकडीची/विदयाशाखेचे मान्यता शासकिय अनुदान तत्वावर दिली असेल तरच तात्पुरता कार्यभार मान्य समजण्यात येईल, अन्यथा त्यावरील सर्व खर्च अमान्य करण्यात येईल.
७. मा.संचालक (उच्चशिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे विषय/तुकडी/विदयाशाखा यांना १०० टक्के अनुदान मान्य केलेल्या वर्षापासून अनुदानित पदे ग्राहय धरण्यात येतील.
८.शैक्षणिक वर्षात कार्यभारानुसार/मान्य निकषानुसार विदयापीठ/संलग्नित महाविदयालये यांच्या आस्थापनेवर मान्य होणारी व सरळसेवा भरतीने भरावयाची अतिरिक्त नवीनपदे शासन निर्णय वित्तविभाग क्रमांक-बीजीटी-१०९७/प्र.क्र.२४-अ/अर्थ-१९, दिनांक २.६.१९९८ व शासन निर्णय समक्रमांक दिनांक १५.१२.१९९८ मधील (परिच्छेद) नुसार शिक्षक संवर्गातील पदे तासिका तत्वावर भरावयाची आहे.
९. शा.नि.क्रमांक-एनजीसी-१२९८/(४६१६)/युनि-४, दिनांक-११.१२.१९९९ मधील निर्देश/अटी यापुढे लागू राहतील.
१०.शासन परिपत्रक दिनांक २८.१.२००० नुसार पद भर्ती संबंधात कार्यवाही करावी.
११.खालील पदांची निश्चिती या कार्यालयातर्फे करुन घेतल्यानंतर विदयापीठाच्या मागासवर्गीय कक्षाकडून सदरच्या पदांचे आरक्षण निश्चित करुन घेतल्यानंतर शासन नियमानुसार सदरची पदे भरण्यासाठी सहसंचालक कार्यालयाचे नाहरकत प्रमाणपत्र घेवूनच नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

१२. शा.नि.दिनांक १० सप्टेंबर २००१ अन्वये पूर्वीच्या मान्य पदापेक्षा कार्यभार वाढल्यामुळे नवीन पदे निर्माण होत असल्यास सदर पदांना शासनाची मान्यता घेवूनच नियमानुसार पदे भरण्या संबंधी कार्यवाही करावी. सदरची नवनिर्मित पदे शासन मान्यते शिवाय भरल्यास त्या पदांचा खर्च अनुदानास पात्र होणार नाही.

दिनांक १.१०.२००७ च्या विदयार्थी संख्येच्या आधारावर शिक्षक कर्मचा-यांची पदनिश्चिती- सन २००७-२००८

| अ.क्र | विषय माध्यम | एकूण कार्यभार | अनुज्ञेय पदे | भरलेली पदे | | रिक्त पदे | | | अतिरिक्त पदे | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | अधिव्याख्याता | | प्राचार्य | | |
| | | | | अधि. | प्राचार्य | पूर्णवेळ | तासिका तत्वावर | | | |
| १ | मराठी | १२ | ०१ | -- | -- | ०१ | -- | -- | -- | ०१ - पूर्णवेळ |
| २ | इंग्रजी | १६ | ०१ | -- | -- | ०१ | -- | -- | -- | ०१ - पूर्णवेळ |
| ३ | हिंदी | १२ | ०१ | -- | -- | ०१ | -- | -- | -- | ०१ - पूर्णवेळ |
| ४ | राज्यशास्त्र | १२ | ०१ | ०१ | -- | -- | -- | -- | -- | ०१ - पूर्णवेळ |
| ५ | संरक्षणशास्त्र | १२ | ०१ | ०१ | -- | -- | -- | -- | -- | ०१ - पूर्णवेळ |
| ६ | समाजशास्त्र | १२ | ०१ | -- | -- | ०१ | -- | -- | -- | ०१ - पूर्णवेळ |
| ७ | इतिहास | १२ | ०१ | ०१ | -- | -- | -- | -- | -- | ०१ - पूर्णवेळ |
| ८ | भूगोल | १२ | ०१ | -- | -- | ०१ | -- | -- | -- | ०१ - पूर्णवेळ |
| ९ | अर्थशास्त्र | १२ | ०१ | -- | -- | ०१ | -- | -- | -- | ०१ - पूर्णवेळ |
| | एकूण | | ०९ | ०३ | -- | ०६ | -- | -- | -- | |
| १० | ग्रंथपाल | | ०१ | -- | -- | ०१ | -- | -- | -- | ०१ - पूर्णवेळ |
| ११ | शा.शि.संचालक | | ०१ | -- | -- | ०१ | -- | -- | -- | ०१ - पूर्णवेळ |
| | एकूण | | ११ | ०३ | -- | ०८ | -- | -- | -- | |

महासंचालक
उच्च शिक्षण
जळगांव विभाग, जळगाव

प्रत माहितीसाठी रवाना- १. वरिष्ठ लेखा परिक्षक, उच्च शिक्षण, जळगांव
२. कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विदयापीठ, जळगांव
३. मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे - १